मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत, द्विरूक्ती झालेल्या ८ ग्रामपंचायतींची नावे वगळून त्यांच्याऐवजी इतर ७ ग्रामपंचायतींची नावे समाविष्ट करून ग्रामपंचायतीच्या बांधकामास मंजुरी प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक: ग्रापंई-२०१९/प्र.क्र.८२/बांधकाम-४

५ वा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,

फोर्ट, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.

तारीख: २१ ऑगस्ट, २०१९

वाचा :-

१) **शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्रमांक:** ग्रापंई-२०१७/प्र.क्र.२४६/बांधकाम-४, दिनांक २३ जानेवारी, २०१८

२) **शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्रमांक:** ग्रापंई-२०१८/प्र.क्र.५३/बांधकाम-४, दिनांक २ नोव्हेंबर, २०१८

३) **शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्रमांक:** ग्रापंई-२०१८/प्र.क्र.९१/बांधकाम-४, दि.३० जून, २०१८

४) **शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्रमांक:** ग्रापंई-२०१८/प्र.क्र.२१/बांधकाम-४, दि.०८ मार्च, २०१९

प्रस्तावना :-

राज्यातील ज्या ग्रामपंचायतींना स्वत:च्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नाही, अशा ग्रामपंचायतींना स्वतंत्र कार्यालयाची इमारत बांधण्यासाठी "मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना" वाचा मधील अनुक्रमांक १ येथील दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये, सुरू करण्यात आलेली आहे. उक्त वाचा मधील अनुक्रमांक ३ व ४ येथील दिनांक ३० जून, २०१८ व दिनांक ०८ मार्च, २०१९ रोजींच्या शासन निर्णयांन्वये ३०२ व ५३८ ग्रामपंचायतींच्या बांधकामास मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. तथापि, सदर शासन निर्णयांत अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी व शेवगांव तालुक्यातील ८ ग्रामपंचातींच्या नावांची द्विरूक्ती

झाल्याने, दिनांक ०८ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयातील सदर ग्रामपंचायतींची नावे वगळून, त्यांच्याऐवजी मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेतंर्गत, स्वत:च्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नसलेल्या ७ ग्रामपंचातींची नावे समाविष्ट करून, सदर ग्रामपंचायतींना स्वत:चे कार्यालय बांधण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेतंर्गत, वाचा मधील अनुक्रमांक ३ येथील दिनांक ३० जून, २०१८ रोजीच्या शासन निर्णयातील अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी व शेवगांव तालुक्यातील ८ ग्रामपंचायतींची नावे, वाचा मधील अनुक्रमांक ४ येथील दिनांक ०८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयान्वये द्विरूक्त झालेली आहेत. त्यामुळे दिनांक ०८ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयातील द्विरूक्ती झालेल्या सदर ८ ग्रामपंचायतींची नावे वगळून त्यांच्याऐवजी, ज्या ग्रामपंचायतींना स्वत:च्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नाही, अशा प्रपत्र-अ मधील रकाना क्रमांक ६ मध्ये नमुद, अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील ५ व बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील २ (एकूण ७) ग्रामपंचायतींना, स्वत:चे ग्रामपंचायत कार्यालय बांधण्यास, वाचा मधील शासन निर्णय, दिनांक २३ जानेवारी, २०१८ व शासन निर्णय, दिनांक २ नोव्हेंबर, २०१८ मधील अटींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

०२. सोबतच्या प्रपत्र-अ मधील स्वत:च्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नसलेल्या ग्रामपंचायतींनी, या योजनेमधून त्यांच्या कार्यालयाचे बांधकाम करावयाचे असल्यास प्रथम ग्रामसभेचा ठराव करुन लोकसंख्येच्या टप्प्याप्रमाणे शासनाने निश्चित केलेल्या बांधकाम मुल्यांनुसार, ग्रामपंचायतीने स्वनिधीतून भरावयाचा हिस्सा भरण्यास सदर ग्रामपंचायत तयार असल्याचे प्रमाणित करावे. सदर ग्रामपंचायतींनी वरीलप्रमाणे ठराव संमत केल्यानंतर संबंधित ग्रामपंचायतींना स्वत:चे कार्यालय उपलब्ध नसल्याची खात्री केल्यानंतर जिल्हा परिषदेने अंतिम मंजूरी प्रदान करावी.

०३. ग्रामपंचायतींनी त्यांच्या कार्यालयाचे बांधकाम शासन निर्णय क्र.ग्रापंई-२०१३/प्र.क्र.१८९/ पंरा-७, दि.३०.०१.२०१४ अन्वये तयार केलेल्या प्रचलित आराखड्यानुसार करणे आवश्यक राहील.

०४. या योजनेतंर्गत अंतिमत: निवड करण्यात आलेल्या ग्रामपंचायतींना त्यांच्या कार्यालयाच्या बांधकामासाठी निधीच्या उपलब्धतेनुसार, टप्प्याटप्प्याने विहीत केलेल्या टक्केवारीच्या मर्यादेत जिल्हा परिषदांमार्फत निधी वितरित करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१९०८२११५०९४९३९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dilip
Babasaheb Patil

Digitally signed by Dilip Babasaheb Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e461e0a32ec649f0a60e4372f7cbbb3edff433d33cc0d95db6f8dbf1fa4f7f, cn=Dilip Babasaheb Patil
Date: 2019.08.21 16:19:06 +05'30'

(दि. बा. पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा, महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
२. मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग यांचे स्वीय सहायक.
६. विभागीय आयुक्त, सर्व.
७. जिल्हाधिकारी, सर्व.
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
९. सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
११.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद, सर्व.
१२.कार्यकारी अधिकारी (बां.), जिल्हा परिषद, सर्व.
१३.जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व.
१४.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
१५.निवड नस्ती, कार्यासन बांधकाम-४, बांधकाम भवन, फोर्ट, मंत्रालय, मुंबई.

शासन निर्णय क्रमांक ग्रापंई-२०१९/प्र.क्र.८२/बांध-४, दिनांक २१ ऑगस्ट, २०१९ सोबतचे सहपत्र.

प्रपत्र “अ ”

अ. क्र.	जिल्हा	तालुका	दिनांक ०८ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये, मंजूरी प्रदान केलेल्या व द्विरूक्ती झाल्याने या शासन निर्णयान्वये वगळण्यात येणाऱ्या ग्रामपंचायतीचे नाव		या शासन निर्णयान्वये मान्यता द्यावयाच्या ग्रामपंचायतीचे नाव
			शासन निर्णयातील अनुक्रमांक	ग्रामपंचायतीचे नाव	
१	२	३	४	५	६
१	अहमदनगर	पाथर्डी	१७५	पारेवाडी	**हत्राळ**
२			१७६	डांगेवाडी	**सातवड**
३			१७७	लांडकवाडी	**पत्र्याचा तांडा**
४			१७८	चितळवाडी	**अंबिकानगर**
५					**कोळसांगवी**
६		शेवगांव	१६३	आंतरवाली बु.	-
७			१६४	दादेगांव	-
८			१६५	माळेगांव ने.	-
९			१६६	शेकटे बु.	-
१०	बीड	पाटोदा			**खडकवाडी**
११					**वडझरी**
एकूण				८	७